MHAH160005772018

**क्रि.चौ.अर्ज क्र. १७६/२०१८**

## निशाणी क्र.५ वरील आदेश

१. अर्जदार हिने सदरहु अर्ज स्त्रीयांचे कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंध कायदा कलम २३ नुसार अंतरिम पोटगी मिळण्याकरीता अर्ज दाखल केला आहे. अर्जदार हिने सदरहु अर्ज गैरअर्जदार क्र.१ याचेकडुन दरमहा रक्कम रूपये ५,०००/- अंतरिम पोटगी, घरभाडे पोटी दरमहा रक्कम रूपये ३,०००/- व गैरअर्जदार यांचेपासुन संरक्षण आदेश मिळण्याकरिता दाखल केला आहे. मी सदरहु अर्ज वाचला.

२. गैरअर्जदार क्र.१ यास नोटीस मिळालेनंतर गैरअर्जदार क्र.१ हा हजर झाला व त्याने त्याचे लेखी म्हणणे (नि.क्र.१५) सादर केले. मी गैरअर्जदार क्र. १ याचे म्हणणे वाचले. गैरअर्जदार क्र.२ हिने या अर्जाच्या उत्तरादाखल तिचे म्हणणे दाखल केले नाही म्हणून, दिनांक ०१.११.२०१८ रोजी निशाणी क्र.१ वर आदेश पारीत करून प्रकरण गैरअर्जदार क्र.२ हिचे विरूध्द विना म्हणणे चालविण्यात आले.

३. अंतरिम पोटगी मागणी अर्जातील कथने तसेच गैरअर्जदार यांनी दाखल केलेले म्हणणे यांचे अवलोकन केले असता खाली नमुद वादप्रश्न माझे विचाराधीन असुन त्यावरील निष्कर्ष मी योग्य त्या कारणमिमांसेसह नोंदविलेले आहेत.

| अ.क्र. | वादप्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदार ही गैरअर्जदार यांनी तिच्यावर कौटूंबिक हिंसाचार केला का हे प्रथम दर्शनी शाबीत करते काय? | होय. |

| | | |
|---|---|---|
| **२.** | अर्जदार ही संरक्षण आदेश मिळण्यास पात्र आहे काय? असल्यास किती ? | होय |
| **३.** | अर्जदार ही निवासी आदेश मिळण्यास पात्र आहेत काय? असल्यास किती ? | नाही. |
| **४.** | अर्जदार ही अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र आहे काय? असल्यास किती ? | अंशतः होकारार्थी. अर्जदार हिस अंतरिम पोटगी द. म.र.रू. १,५००/- प्रस्तुत अर्जाचे दाखल तारखेपासुन देण्यात येतो. |
| **५.** | आदेश काय ? | अर्ज अंशतः मंजुर करण्यात येत आहे. |

## कारणमिमांसा

४. अर्जदार हिने प्रस्तुत अर्जाच्या कामी निशाणी क्र.३ सोबत खालील कागदपत्रे दाखल केली आहेत :-

१) गैरअर्जदार क्र.1 यांचे नावावरील ८अ उतारा,
२) गैरअर्जदार क्र.1 यांचे नावावरील गट क्र.४२३ चा ७/१२ उतारा,
३) गैरअर्जदार क्र.1 यांचे नावावरील गट क्र.४२१ चा ७/१२ उतारा,
४) गैरअर्जदार क्र.1 यांचे नावावरील गट क्र.८१५ चा ७/१२ उतारा,
५) गैरअर्जदार क्र.1 यांचे नावावरील गट क्र.६३२/२ चा ७/१२ उतारा,
६) गैरअर्जदार क्र.1 यांचे नावावरील गट क्र.६३ चा ७/१२ उतारा,
७) गैरअर्जदार क्र.1 यांचे नावावरील गट क्र.३३७ चा ७/१२ उतारा,
८) गैरअर्जदार क्र.1 यांचे नावावरील गट क्र.३१७/२ चा ७/१२ उतारा, मौजे सावरगांव पाट, ता. अकोले, जि. अहमदनगर येथील.

५. गैरअर्जदार क्र.१ याने त्याचे म्हणण्याचे पुष्ठयर्थ कागदोपत्री पुरावा दाखल केला नाही. अर्जदारातर्फे तज्ञ वकील श्री. ए. पी. डेरे, गैरअर्जदार क्र.१ तर्फे

तज्ञ विधिज्ञ श्रीमती. एम. के. हांडे यांचा युक्तिवाद ऐकला.

**वादप्रश्न क्र.1 बाबत :-**

६. कलम २३ अन्वये अंतरिम अर्जाचा निर्णय करताना अर्जदार हिने प्रथमदर्शनी गैरअर्जदार हे तिचा कौटुंबिक छळ करत आहेत किंवा गैरअर्जदार यांनी तिचा कौटुंबिक छळ केला होता किंवा गैरअर्जदार हे लगतच्या भविष्यामध्ये तिचा कौटुंबिक छळ करण्याची शक्यता आहे हे दाखविणे आवश्यक असते.

७. अर्जदार ही असे कथन करते की, गैरअर्जदार क्र.१ हा तिचा पती आहे तर गैरअर्जदार क्र.२ हिचेसोबत गैरअर्जदार क्र.१ याचे अनैतिक संबंध आहेत.

८. अर्जदार हिने तिच्या कथनामध्ये गैरअर्जदार यांनी केवळ दहा ते पंधरा दिवस चांगले नांदविले. लग्नानंतर तु वेडी आहेस, तुला मुलबाळ होणार नाही, तुला स्वयंपाक व्यवस्थित येत नाही, तुला घरातील आवरता येत नाही, पाहुण्यांचा मानपान ठेवता येत नाही अशा कारणावरून गैरअर्जदार तिला मानसिक व शारिरीक त्रास देवु लागले. सन २००० साली ती नाईलाजास्तव तिचे माहेरी गेली असता गैरअर्जदार क्र.१ याने तिची विचारपुस केली नाही व तो तिला नांदविण्यासाठी घेण्यास आला नाही. त्या दरम्यानचे काळात गैरअर्जदार क्र.१ याचे गैरअर्जदार क्र.२ हिचेसोबत अनैतिक संबंध प्रस्थापित झाले. सन २००५ साली तिचे सासुचा अपघात झाला व गैरअर्जदार क्र.२ ही बाळंतपणासाठी गेल्यामुळे गैरअर्जदार क्र.१ हा तिला नांदण्यास घेवुन आला. सन २००७ साली अर्जदार ही गरोदर असताना गैरअर्जदार तिला तुच्छ वागणुक देवुन तिला उपाशी ठेवु लागले. त्यादरम्यान अर्जदारास मृत बाळ जन्माला आल्यामुळे तिचे शारिरीक हाल झाले. सन २००८ ते २०१२ चे दरम्यान गैरअर्जदार हे कपडे धुण्यास साबण न देणे, घरातील कुठल्याही वस्तुला हात लावु न देणे, तु येथे राहयचे नाही, याठिकाणी तुझा कुठलाही हक्क नाही अशी वागणुक देवुन तिचा शारिरीक व मानसिक छळ करू लागले. त्यामुळे अर्जदार ही तिचे माहेरचे आश्रयाने राहु लागली. सन २०१८ साली तिचे चुलत सासुचे निधन झाल्यामुळे ती सासरी गेली असता गैरअर्जदार यांनी धमकावले की, तु येथे

थांबायचे नाही, तु येथे यायचे नाही, तु माझी बायको नाही, तुझा कोणताच प्रकारचा अधिकार नाही, तुला काही भेटनार नाही, तुला कुठे जायचे तेथे जा, तु कोर्टात जा नाही तर तुला जे कायचे ते करून घे. गैरअर्जदार यांनी तिचा शारिरीक व मानसिक छळ केलेला आहे.

९. उलटपक्षी गैरअर्जदार क्र.1 हा त्याचे लेखी म्हणण्यामध्ये अर्जदार व त्याचे लग्न झाले ही बाब मान्य करतो. तथापी त्याने अर्जदाराचे अर्जातील इतर मजकुर नाकारलेला आहे. गैरअर्जदार क्र.१ याने असे कथन केले की, लग्नानंतर अर्जदार फक्त १० ते १५ दिवस नवी नवरी म्हणुन राहीली. अर्जदार हिने त्यास कोणत्याही प्रकारचे सुख दिलेले नाही. अर्जदार ही त्याचे कुटुंबातील लोकांसोबत सतत भांडणे करू लागली, घरात कोणताही कामधंदा करत नसे, घरातील लोकांना उलटुन बोलत असे, झोपुन राहत असे व त्याबाबत विचारणा केली असता मला येथे करमत नाही, हे लग्न माझे इच्छेविरूध्द झाले आहे, मला नांदायचे नाही, केवळ आई वडीलांचे इच्छेखात मी तुमचेशी लग्न केले, मला बळजबरीने नांदण्यास भाग पाडले तर मी जिवाचे बरेवाईट करून घेईन व तुम्हाला सर्वांना बांधून देईल अशी धमकी देत होती.

१०. गैरअर्जदार क्र.१ याचे पुढे असे कथन आहे की, सन १९९८ चे डिसेंबर महिन्यामध्ये नातेवाईक व प्रतिष्ठीत व्यक्तींच्या मध्यस्थीने अर्जदार व त्यांचे मध्ये बैठक झाली असता सदर बैठकीमध्ये अर्जदाराने नांदण्यास स्पष्ट नकार देवुन फारकतीची मागणी केली. त्यांचेमध्ये फारकत घेण्याचे साक्षीदारांसमक्ष ठरले. परंतु फारकत नोंदविणेस तांत्रिक अडचण येत असल्यामुळे तांत्रिक अडचण दुर झालेनंतर संमतीने फारकत नोंदविण्याचे ठरले. परंतु त्यानंतर अर्जदाराने सहकार्य न केल्यामुळे अद्यापपावेतो त्यांची फारकत झालेली नाही. दरम्यानचे काळात ‘‘ कागदोपत्री फारकत घ्यायची नसेल तर नांदायला ये’’ अशी गैरअर्जदार क्र.१ याने अर्जदारास विंनती केली परंतु तिने दुजोरा दिला नाही, उलट आपली फारकत बैठकीतच झालेली असल्यामुळे नांदण्यास येण्याचा प्रश्न नाही असे अर्जदार बोलली. सन २००१ साली गैरअर्जदार क्र.२ हिचेसोबत तो राहु लागला. गैरअर्जदार

क्र.१ व २ आणि अर्जदार हे कधीच एकत्र राहीलेले नाहीत. त्यांनी अर्जदाराचा कोणताही शारिरीक व मानसिक छळ केलेला नाही. अर्जदाराने खोटा अर्ज दाखल केलेला आहे.

११. अर्जदाराच्या विद्वान वकीलांनी युक्तीवाद केला की, गैरअर्जदार यांनी वेळोवळी अर्जदाराचा कौटूंबिक छळ केल्यामुळे अर्जदार हिला गैरअर्जदारापासून विभक्त राहणे भाग पडले आहे. अर्जदार हिला उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही तर गैरअर्जदार क्र.१ याचेकडे उत्पन्नाचे साधन असुन देखील अर्जदाराच्या उदरनिर्वाहाकडे दुर्लक्ष केले आहे. तथापी, गैरअर्जदार यांच्या विद्वान वकीलांनी युक्तीवाद केला की, सन १९९८ पासुनच अर्जदाराने स्वतःहुन गैरअर्जदार क्र.१ याचा त्याग केलेला असुन त्यांचेत बैठक होवुन फारकत घेण्याचे ठरले होते.

१२. अर्जदाराच्या कथनावरुन व अभिलेखावर दाखल असलेल्या कागदपत्रावरुन गैरअर्जदार क्र.१ याने तिला शारिरीक व मानसिक त्रास दिल्याचे निदर्शनास येते हे प्रथमदर्शनी सिध्द होते. कारण गैरअर्जदार क्र.१ याने अर्जदार हिचा सांभाळ करण्याचे नाकारले आहे.

१३. उभयपक्षांची परस्पर विरोधी अभिकथने व अभिलेखाचे व माहितीगार वकीलांच्या युक्तीवादाच्या पार्श्वभूमीवर अवलोकन केले असता, अर्जदार हिने तिला गैरअर्जदार यांच्याकडून शारिरीक व मानसिक त्रास झाल्याची बाब सदय स्थितीला उपरोक्त नमुद पुष्टयर्थ कथनावरून अभिलेखावर नमुद केलेली आहे. सबब सदरची बाब ही सदर कायद्याच्या कलम ३ स्पष्टीकरण - १(अ) प्रमाणे शारिरीक छळ यामध्ये अंर्तभुत होते. तसेच अर्जदार हिने नमुद केलेले आहे की, गैरअर्जदार क्र.१ याने तिच्या उदरनिर्वाहाची कसलीही सोय केलेली नाही. अर्जदार ही गैरअर्जदार क्र.१ पासून विभक्त राहत आहेत, ही बाब गैरअर्जदार क्र. १ याने नाकारलेली नाही. सबब सदरची बाब ही कलम ३ स्पष्टीकरण -१(ड) प्रमाणे आर्थिक छळ यामध्ये अंर्तभुत होते. कारण पत्नीकरीता उदरनिर्वाहाची सोय न

करणे आणि तिला स्वत:च्या उत्पन्नापासून वंचीत ठेवणे यास सदर तरतुदीप्रमाणे आर्थिक छळ असे संबोधीत केलेले आहे. सबब, उपरोक्त नमुद कारणमिमांसेवरुन हे स्पष्ट होते की, गैरअर्जदार यांनी अर्जदार हिचा कौटुंबिक हिंसाचार केल्याचे अर्जदार हिने प्रथमदर्शनी शाबीत केलेले आहे. **करीता मी वादप्रश्न क्र.१ चे उत्तर होकारार्थी नोंदवित आहे.**

**वादप्रश्न क्र.२ बाबत :-**

१४. अर्जदार हिने कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा-२००५ चे कलम १८ अन्वये संरक्षण आदेश गैरअर्जदार यांचे विरुध्द होवून मिळावा.

१५. कौटुंबिक हिसांचारापासून महिलांचे संरक्षण कायदा-२००५ चे कलम २३ मध्ये नमुद केले आहे की, पिडीत व्यक्तीवर कौटुंबिक हिंसाचार झाला आहे किंवा पिडीत व्यक्तीवर नजीकच्या भविष्य काळामध्ये कौटुंबिक हिंसाचार होण्याची शक्यता आहे असे निदर्शनास आल्यास न्यायदंडाधिकारी पिडीत व्यक्तीच्या लाभामध्ये अंतरीम संरक्षण आदेश पारीत करु शकतात.

१६. अर्जदार हिने मागणी केलेला संरक्षण आदेश की, गैरअर्जदार हे तिच्यावर कौटुंबिक हिंसाचार करणार नाहीत या संदर्भाने निर्धारण बिंदु क्रमांक १ च्या कारणमिमांसेमध्ये अर्जदार हिने गैरअर्जदार यांनी तिच्यावर केलेला कौटुंबिक हिंसाचार प्रथमदर्शनी शाबीत केला आहे. सबब सदर अंतरिम संरक्षण आदेश मिळण्यास अर्जदार ही सद्यस्थितीस पात्र आहे. **करीता मी वादप्रश्न क्र. २ चे उत्तर होकारार्थी नोंदवित आहे.**

**वादप्रश्न क्र.३ बाबत :-**

१७. अर्जदार हिने घरभाडे पोटी दरमहा रू.३,०००/- मिळावे अशी मागणी केलेली आहे.

१८. अर्जदार हिने गैरअर्जदार यांचेकडुन घरभाडे पोटी तिला दरमहा रूपये ३,०००/- मिळावे अशी मागणी केलेली आहे. तथापी अर्जदार हिने तिचे कथनाचे पुष्ठयर्थ ती सध्या निश्चित कोणाकडे भाडेकरू म्हणुन राहते याबाबत तिचे कथनात उल्लेख केलेला नाही. तसेच अर्जदार ही घरभाडे पोटी प्रतिमहा रूपये तीन हजार खर्च करते ही बाब दाखविण्याकरीता तिने कोणताही लेखी पुरावा अभिलेखात दाखल केला नाही. अर्जदाराचे कथनातील परिच्छेद क्र.२ मध्ये तिने स्पष्ट नमुद केले आहे की, ती तिचे माहेरी मौजे टाकळी, ता. अकोले, जि. अहमदनगर येथे राहते. अर्जदार हिचे असे कथन नाही की, तिचे माहेरचे लोक तिला त्यांचेसोबत राहु देत नाही. त्यामुळे तिला वेगळे भाडेतत्वावर राहणे शिवाय दुसरा पर्याय नाही असे तिचे कथन नाही. सबब अर्जदार ही घरभाडे मिळण्यास सद्यस्थितीला पात्र नाही. **करीता मी वादप्रश्न क्र.३ चे उत्तर नकारार्थी नोंदवित आहे.**

**वादप्रश्न क्र.४ बाबत :-**

१९. कौटुंबिक हिसांचारापासून महिलांचे संरक्षण कायदा-२००५ चे कलम २३ मध्ये नमुद केले आहे की, पिडीत व्यक्तीवर कौटुंबिक हिंसाचार झाला आहे असे निदर्शनास आल्यास न्यायदंडाधिकारी पिडीत व्यक्तीच्या लाभामध्ये अंतरीम पोटगी आदेश व इतर आदेश पारीत करु शकतात.

२०. अर्जदार हिच्या कथनाप्रमाणे गैरअर्जदार यांनी ती सासरी नांदावयास गेल्यानंतर तिचा वेळोवेळी शारिरीक व मानसिक छळ केलेला आहे. गैरअर्जदार क्र. १ याने स्वत:हुन अर्जदाराचा त्याग करून तिला सांभाळण्याची व तिचे अन्नवस्त्राची जबाबदारी टाळली आहे. गैरअर्जदार क्र.१ याने अर्जदाराचा त्याग केल्यामळे ती नाईलाजास्तव गैरअर्जदार क्र.१ याचे पासून विभक्त अर्जदार हिचे माहेरी मौजे टाकळी, ता. अकोले येथे तिचे आईवडीलांचे आश्रयाने राहत आहे. ती पुढे असे कथन करते की, गैरअर्जदार यांची सांपतिक व आर्थिक परिस्थिती अत्यंत चांगली आहे. गैरअर्जदार क्र.१ यांचे कुटुंबाची बागायत जमिन असुन त्यामध्ये टोमॅटो, वालदड अशी नगदी पिके घेतात व त्यापासुन त्याला सुमारे १५ ते २० लाख निव्वळ

वार्षिक उत्पन्न मिळते. गैरअर्जदार क्र.१ याचेवर तिचे व्यतिरीक्त कोणीही अवलंबुन नाही. गैरअर्जदार क्र.१ याने तिला सन २०१२ रोजी घराबाहेर हुसकावुन दिले. त्यानंतर तिने नांदण्यास जाण्याचा प्रयत्न केला परंतु गैरअर्जदार क्र.१ याने तिला घरात घेतले नाही. गैरअर्जदार क्र.१ याने तिचे अन्नवस्त्राची व पालनपोषणाची कोणतीही व्यवस्था केली नाही. सबब अंतरीम पोटगी मिळणे आवश्यक आहे.

२१. उलटपक्षी गैरअर्जदार यांनी कथन केले आहे की, त्याची आर्थिक परिस्थिती अत्यंत गरीबीची असुन त्याचेकडे तुटपुंजी जिरायत शेती आहे. त्याचेवर त्याची वृध्द आई व तीन अपत्यांची जबाबदारी आहे. याउलट अर्जदार ही माहेरी राहुन शेतीकाम करते व त्यापासुन तिला दरमहा रूपये पाच ते सहा हजार उत्पन्न मिळते व ती तिचा उदरनिर्वाह करण्यास समर्थ आहे. सबब अर्जदाराचा अर्ज रद्द करण्यात यावा.

२२. अर्जदार व गैरअर्जदार क्र.१ यांच्या माहितीगार वकीलांनी त्यांच्या परस्पर विरोधी कथनाप्रमाणे युक्तीवाद केला. त्यांनी त्यांचे कथनाप्रमाणेच युक्तिवाद केला.

२३. उपरोक्त नमुद अर्जदार व गैरअर्जदार यांची कथने आणि दोन्ही पक्षाच्या माहितगार वकीलांनी केलेला युक्तीवाद लक्षात घेता. तसेच स्त्रियांचे कौटुंबिक हिसांचारापासून संरक्षण कायदा २००५ चे कलम २० व २३ चे अवलोकन केले असता, अर्जदार ही अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र आहे. अंतरिम पोटगीची रक्कम ठरविताना गैरअर्जदार क्र.१ याचे मासिक उत्पन्न, दोन्ही पक्षकारांचे राहणीमान, दैनंदिन गरजा व त्यांचा होणारा खर्च लक्षात घेणे आवश्यक ठरते.

२४. अर्जदाराने निशाणी क्र.३ सोबत दाखल केलेले ८अ उतारे व ७/१२ उतारे दाखल केले आहेत. त्या उता-यांचे अवलोकन केले असता गैरअर्जदार क्र. १ यास उत्पन्नाचे साधन आहे हे स्पष्ट होते. याउलट गैरअर्जदार क्र.१ याने त्याचे कथनामध्ये नमुद केले आहे की, त्याचेकडे जिराईत शेतजमिन आहे. यावरून देखिल त्यास उत्पन्न मिळते हे बाब स्पष्ट होते. गैरअर्जदार क्र.१ हा शारिरीक

दृष्टया धडधाकट आहे, ही बाब त्याच्या लेखी म्हणण्यावरून स्पष्ट होते तसेच तो घरातील कर्ता पुरूष असल्यामुळे कुटूंबाची जबाबदारी त्याच्यावर आहे ही बाब देखील कथन केलेली आहे. सदर बाबी प्रथमदर्शनी लक्षात घेतल्या असता गैरअर्जदार क्र.१ यास दरमहा रक्कम रूपये ५,०००/- ते ६,०००/- उत्पन्न मिळत आहे, असे सद्यस्थितीला गृहीत धरता येईल. त्यामुळे, अर्जदारास पोटगी देण्याची गैरअर्जदार क्र.१ याची पुरेशी ऐपत आहे, ही बाब प्रथमदर्शनी स्पष्ट होते. तसेच अर्जदार ही सध्या गैरअर्जदार क्र.१ पासुन विभक्त राहत आहे. सकृतदर्शनी सदर बाबी लक्षात घेतल्या असता गैरअर्जदार क्र.१ याचेकडून प्रस्तुतचा अर्ज दाखल तारखेपासुन अर्जदार ही दरमहा रक्कम रुपये १,५००/- पोटगी म्हणून मिळणेस पात्र आहे. **सबब, वादप्रश्न क्र. ४ चे उत्तर मी अंशतः होकारार्थी नोंदवित आहे.**

**वादप्रश्न क्र. ५ बाबतः-**

२५. वादप्रश्न क्र.१ ते ४ ची कारणमिमांसा व निष्कर्ष लक्षात घेता अर्जदार ही प्रस्तुतच्या अर्जाचा खर्च मिळण्यास पात्र आहे. सबब मी **वादप्रश्न क्र. ५ चे निष्कर्षादाखल खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.**

**:: आदेश ::**

(१) सदरहु अर्ज निशाणी क्र. ५ हा रूपये ५००/- (अक्षरी रुपये पाचशे मात्र) खर्चासह अंशतः मंजुर करण्यात येतो.

(२) गैरअर्जदार क्र. १ व २ यांनी या आदेशाच्या तारखे पासून ते मुळ अर्ज निकाली लागेपर्यंत अर्जदार हिच्यावर कोणत्याही प्रकारे कौटुंबिक हिंसाचाराची कृती करू नये म्हणून त्यांना प्रतिबंधीत करण्यात येत आहे.

(३) गैरअर्जदार क्र.१ याने सदर अर्ज दाखल तारखेपासून म्हणजेच दिनांक २२/०६/२०१८ पासुन मूळ अर्ज अंतिमतः निकाली निघेपर्यंत अंतरिम निर्वाह भत्ता पोटगी अर्जदार हिला दरमहा रक्कम रूपये १,५००/-(रूपये एक हजार पाचशे फक्त) द्यावे.

(४) या आदेशाची प्रत अर्जदार व गैरअर्जदार यांना विनामुल्य देण्यात यावी. तसेच सदर आदेशाची प्रत जाबदेणार ज्या ठिकाणी राहतात त्या ठिकाणच्या पोलिस ठाण्यातील पोलिस अंमलदारास माहितीसाठी पाठविण्यात यावी.

सही/-
(सचिन एच. खाडे)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, अकोले,
ता. अकोले जि. अहमदनगर.

दिनांक : १७/१०/२०१९